3280
जाक्र./जिपना/शिअप्रा/प्रा-19/ /2021
कार्यालय शिक्षण विभाग (प्रा)
जिल्हा परिषद नांदेड
दिनांक - 20.07.2021

प्रति,

1.गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती सर्व
2.मुख्याध्यापक ,जिल्हा परिषद हायस्कुल
नांदेड जिल्हा सर्व

विषयः- सार्वत्रिक बदल्या 2021
हरकती व अक्षेपा करीता वास्तव्य सेवाजेष्ठता यादी प्रसीद्ध करणे बाबत.

संदर्भः-1. महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णक क्र.जिपब- 414/प्र.क्र.112/आस्था-15 दनांक 15.05.2014
2. शासन परिपत्रक क्र.संकीर्ण 2021/प्रक्र.589/आस्था 14 ग्राम विकास व बांधकाम भवन मुंबई दि.14.07.2021.
3.मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा),जिल्हा परिषद नांदेड यांचे पत्र क्र. **4444** दिनांक **16.07.21**

उपरोक्त विषयान्वये संदर्भाधीन मुद्या नुसार सुचीत करण्यात येते की,नांदेड जिल्हा परिषद शिक्षण विभाग (प्रा) अंतर्गत सार्वत्रिक बदल्या 2021 करिता शासनाने संदर्भ क्र.02 नुसार 15 टक्के बदल्या करण्याबाबत आदेशीत केले आहे.संदर्भ क्र.01 नुसार शासनाने विहीत केल्यानुसार विभागातील विस्तार अधिकारी शिक्षण,अराजपत्रित मुख्याध्यापक , माध्यमिक शिक्षक,मराठी/उर्दु ,पर्यवेक्षक /शारीरिक शिक्षक / चित्रकला शिक्षक/केंद्र प्रमुख/प्रयोग शाळा सहाय्यक पर्यवेक्षक या संवर्गाच्या कार्यरत कर्मचाऱ्यांच्या त्यांच्या वास्तव्य सेवाजेष्ठते नुसार याद्या ,हरकती व अक्षेपा करीता प्रसीद्धीस देण्याबाबत उल्लेखीत केले आहे.संदर्भ क्र.03 नुसार जिल्हा परिषद नांदेड सामान्य प्रशासन विभागाने बदल्याबाबत खालील प्रमाणे कार्यक्रम निश्चीत केला आहे.

| अ.क्र | कार्यसुची | दिनांक |
|---|---|---|
| 1 | बदली करीता संवर्ग निहाय प्राथमिक वास्तव्य सेवाजेष्ठता याद्या तयार करुन प्रसीद्ध करणे. | **22.07.2021** |
| 2 | संबंधीत कर्मचारी यांचे विनंती बदलीचे अर्ज स्विकारणे | **22.07.2021** |
| 3 | प्राथमिक वास्तव्य सेवाजेष्ठता यादीवर आक्षेप व हरकती मागवीणे | **24.07.2021** |
| 4 | अक्षेप व हरकतीचे निराकरण करुन अंतीम वास्तव्य सेवा जेष्ठता यादी प्रसिद्ध करणे. | **25.07.2021** |

त्यानुसार वरिल संवर्गाच्या वास्तव्य सेवा जेष्ठता याद्या सर्व कर्मचाऱ्यांच्या अवलोकनास्तव प्रसिद्धीस देण्यात येत आहे.आपल्या अधिनिस्त सर्व कर्मचाऱ्यांच्या सदर यादी नजरेस आणून त्यांचे आपले स्तरावर स्वाक्षरी घेण्यात यावी व आक्षेप व विनंती बदली अर्ज सादर करावयाचा असल्यास गट शिक्षणाधिकारी यांचे मार्फत सादर करण्यात यावेत. तसेच वरील संवर्गाच्या प्राथमिक सेवा जेष्ठता याद्या जिल्हा परिषदेच्या www.zpnanded.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. सर्व संबंधीतांना आपल्या स्तरावरुन सुचना देण्यात याव्यात.सर्व गटशिक्षणाधिकारी यांनी प्राप्त आक्षेप अर्ज व विनंती बदली अर्ज यादीसह या कार्यालयात एकत्रीत संकलीत करुन दिनांक **24.07.2021 सायंकाळी 5.00 वा** पर्यंत प्रा-19 या शाखेकडे सादर करावीत.
विहीत दिनांकास प्राप्त आक्षेप ग्राह्य धरल्या जातील प्राप्त आक्षेपाची शासन निर्णयानुसार पुराव्यासह पडताळणी गटशिक्षणाधिकारी यांनी करुन दिनांक **24.07.2021** रोजी सायंकाळी 06 पर्यंत ssananded1@gmail.com या संकेतस्थळावर प्रमाणपत्रासह अंतीम यादी सादर करावी व Hard copy व spoft copy सुद्धा याच प्रकारे संबंधीत शाखेस सादर करावी

**शिक्षणाधिकारी (प्रा.)**
**जिल्हा परिषद नांदेड**